दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २२ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २७८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# पिझ्झा, बर्गर देणाऱ्या पोलिसांना बरखास्त करू; देवेंद्र फडणवीस यांचा कडक इशारा

**वेदांत अग्रवाल याला पिझ्झा, बर्गर देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवरही आता कारवाई होणार आहे. याबाबत सीसीटीव्ही फुटेज तपासून कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. स्वत: गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे संकेत दिले आहेत.**

### तर वरच्या न्यायालयात दाद मागणार'

“पोलिसांनी तत्काळ वरिष्ठ न्यायालयात अर्ज केला आणि न्यायालयाने त्याची दखल घेतली. कायद्यानुसार, बाल न्यायाधीकरणाच्या आदेशावर फेरविचार करायचा असेल तर पुन्हा त्याच न्यायालयात जावे लागते आणि त्यांनी फेरविचार केला नाही तर वरच्या न्यायालयात दाद मागता येते. त्यामुळे कायद्यानुसार, ती कार्यवाही करण्यात येत आहे. वरिष्ठ न्यायालयाने घेतलेली भूमिका पाहता निश्चितपणे बाल न्यायाधीकरण फेरविचार करेल, अशी खात्री आहे”, असा विश्वास फडणीसांनी व्यक्त केला.

**(बीड प्रतिनिधी)**

पुण्यातील हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी वेदांत अग्रवाल याला अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याला पिझ्झा आणि बर्गर खाऊ घातल्याचा आरोप केला जातोय. या आरोपांवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोठा इशारा दिला आहे. आरोपी वेदांत अग्रवाल याला पिझ्झा, बर्गर देणाऱ्या पोलिसांना बरखास्त करू, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील हिट अँड रन घटनेची गंभीर दखल घेतली आहे. जनतेकडून या प्रकरणावर दबाव वाढल्यानंतर फडणीस आज थेट पुणे पोलीस आयुक्तालयात दाखल झाले. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत घटनेचा आणि पोलिसांनी केलेल्या कारवाईचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. ही घटना अतिशय गंभीर असून, कुणालाही सोडणार नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. तसेच स्वातंत्र्याचा स्वैराचार होणार



नाही, याकडे पालकांनी लक्ष द्यावे, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले. “बाल न्याय मंडळाच्या पुढच्या आदेशानुसार याप्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच पोलिसांकडून कोणती वेगळी वागणूक मिळाली असेल तर सीसीटीव्ही फुटेज तपासून त्या पोलिसांना बडतर्फ करण्यात येईल”, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. “पोलिसांनी या घटनेत भादंविचे 304 हे कलम लावले आहे, 304 अ लावलेले नाही. त्यामुळे प्रारंभीच कठोर भूमिका घेण्यात आली. या प्रकरणातील मुलगा हा 17 वर्ष 8 महिन्याचा आहे. पण, निर्भया प्रकरणानंतर जे बदल कायद्यात झाले, त्यानुसार, गंभीर गुन्ह्यात अल्पवयीन मुलाला सुद्धा सज्ञान मानण्यात यावे, अशी तरतूद आहे. तसेही पोलिसांनी आपल्या पहिल्याच अर्जात नमूद केले आहे. पण, बाल न्यायाधिकरणाने पोलिसांची भूमिका ऐकून घेतली नाही. त्यांनी सामाजिक सुधारणांसंबंधीचे आदेश दिले आणि त्यातून आणखी जनक्षोभ झाला”, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# मान्सुन पुर्व तयारीची आवश्यक कार्यप्रणालीसह यंत्रणेने सज्ज राहावे-अपर जिल्हाधिकारी

**( बीड प्रतिनिधी )**

मान्सुन पुर्व तयारीची आवश्यक कार्यप्रणालीस यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी आज झालेल्या बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात मान्सुन २०२४ पूर्वतयारीबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी निर्देश दिले. मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश पाठक हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. तसेच प्रत्यक्ष बैठकीस अपर जिल्हाधिकारी, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजदीप बन्सोड तसेच काही विभागाचे अधिकारी ही प्रत्यक्ष उपस्थित होते. यासह सर्व उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी, तहसीलदार, नगर पालीकाचे मुख्य अधिकारी, आणि आवश्यक त्या विभागाचे कार्यलयीन प्रमुख अथवा सहायक दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीस उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी यांनी या आढावा बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित आणि दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना सांगितले, मान्सुन पुढील महिण्याच्या पहिल्या आठवडयात दाखल होणार असून यासाठी पुर्वतयारीची आवश्यक कार्यप्रणाली प्रत्येक विभागाच्या हाती असावी. नैसर्गिक आपत्ती ही कधीही येऊ शकते. वेळेवर यंत्रणांची तारांबळ न उडावी, नागरीकांचे हाल होऊ नये यासाठी यंत्रणेने सज्ज राहावे. तसचे सर्व विभागाने यंत्रणेने त्यांचे आवश्यक कार्यप्रणालीचा अहवाल शुक्रवार दि. २४ मे २०२४ पर्यंत जिल्हा व्यवस्थापन विभागास सादर करावी, असे निर्देशित केले. ज्या यंत्रणाकडे आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य असतील त्यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या साहीत्यांची शहानीशा करून घ्यावी, आवश्यक ते साहित्य नसल्यास तशी मागणी नोंदवावी. सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या यंत्रणेचा बैठका घेऊन पुर्व तयारीचा आढावा घ्यावा. गोदावरी, सिंदफणा, बिंदुसरा या नदयांच्या किनारी असणाऱ्या लोकवस्तींना सावधगीरीच्या सुचना आधीच देण्यात याव्यात, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पाठक यांनी संपुर्ण यंत्रणेला केले. तसेच पुर नियंत्रण कक्ष २४ तास सक्रीय राहतील त्यांचे संपर्क क्रमांक सुरू असतील आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे त्यांची माहिती असेल जेणे करून नागरीकांना वेळोवेळी सावध करता येणार अशा सुचनाही केल्या. आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधांची कमतरता भासणार नाही याबाबत काळजी घ्यावी. तसेच आरोग्य पथके सज्ज ठेवावी. साथीचे, जलजन्य अथवा पावसाच्या पाण्याने होणाऱ्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी पाण्याची तपासणी करून घ्यावी, पशु संवर्धनांची काळजी घ्यावी, मान्सुन दरम्यान गांवामध्ये होणाऱ्या यात्रा/जत्रे दरम्यान विष बाधा होणार नाही याबाबत योग्य दक्षता घेऊन तशी कार्यवाही करून अहवाल सादर करावे, अशा सुचना श्री. कुलकर्णी यांनी यावेळी केल्या. बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणारे रस्त्यांची डागडुजी करून घेणे, नगरपालीका विभागाच्या अंतर्गत येणारे रस्ते, नाल्याची सफाई, धोका दायक इमारतींना नोटीस, अनाधिकृत फलक काढून टाकणे, तसेच नगरपालीकेतील आपत्ती व्यवस्थापन पथक २४ तास सक्रीय राहतील यांची काळजी घेणे. नैसर्गिक अथवा अन्य आपत्तीच्या काळात विद्युत सेवा कोलमडणार याची नाही काळजी घेणे महावितरण विभागाने तसेच प्रतिबंधात्मक कारवाईचे व्यवस्थापन करावे, अशा सुचना केल्या. पुढील महिण्यात शाळा सुरू होणार असून विद्यार्थ्यांना मिळणारे अन्न नीट असावे याचे निर्देश प्राथमिक शिक्षण अधिकारी यांना दिले. अंगनवाडया दुरूस्त करून घेणे अथवा पर्यायी व्यवस्था करने. अशा सुचना यावेळी करण्यात आल्या. आतापासुन योग्य दक्षता घेतली गेल्यास आपत्तीच्यावेळी लगेच प्रतिसाद देऊन परीस्थिती नियंत्रणात आणता येईल, असेही श्री कुलकर्णी यावेळी म्हणाले.



# १२ वी बोर्ड परिक्षेत साधना साळुंकेचे घवघवीत यश

**वादळवार्ता/बीड**

बीड नागापूर खुर्द येथील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांची कन्या साधना साळुंके हिने इयत्ता बारावी सायन्समध्ये ८१ टक्के मिळवून यश संपादन केले आहे. बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवाशी साधना चंद्रकांत साळुंके हिने १२ बोर्ड परिक्षेत इंग्रजी-५८, मराठी ८६, मॅथ-९०, फिजीक्स-१, केमिस्ट्री ८९, बायलॉजी-९२ गुण प्राप्त केले. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल बीड लोकरंजन तसेच अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



कु. प्रणिती व चि. प्रसेनजीत अमर साळवे यांस कराटे मार्शल आर्ट असोसिएशन माजलगाव च्या वतीनं बेल्ट वितरण समारंभ प्रसंगी उपस्थित सा. लोकरंजन चे संपादक परमेश्वर सोळंके -

# गोविंदस्मृती स्मार्ट ग्रंथालयाचा लोकार्पण सोहळा दिमाखात संपन्न

**बीड : प्रतिनिधी**

बीड । प्रतिनिधी : बऱ्हाणपूर बीड येथे गोविंदस्मृती स्मार्ट ग्रंथालयाचा लोकार्पण सोहळा दिमाखात संपन्न झाला. बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या शुभहस्ते स्मार्ट ग्रंथालयाचा लोकार्पण सोहळा पार पडला. या लोकार्पण सोहळ्याला संबोधीत करताना पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सर्वज्ञ फाउंडेशनचे अध्यक्ष विजय लांडे व बऱ्हाणपूर ग्रामस्थांचे अभिनंदन केले व गोविंद स्मृती स्मार्ट ग्रंथालयामुळे बऱ्हाणपूर चा सामजिक कार्याचे गाव म्हणून लौकिक मिळेल या शब्दात गौरव केला. या लोकार्पण सोहळयाचा साक्षीदार झालो हा माझ्यासाठी गौरवाचा क्षण आहे या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. या लोकार्पण सोहळ्यासाठी बीडचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, नायब तहसीलदार सुहास हजारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सलमान शेख, प्रा. डॉ. अनिल चिंधे, अनिरुद्ध सानप गटविकास अधीकारी, बीड, नारायण घोडके, उदयोजक, हेमाकांत महामुनी, शंकर शिंदे आदी मान्यवरांसह बहऱ्हाणपूर पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते या मध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता. पुण्यातून अनेक मान्यवर या सोहळ्यासाठी उपस्थित होते. अत्यंत खडतर परिस्थितीवर मात करीत सर्वज्ञ फाउंडेशनचे अध्यक्ष विजय लांडे यांनी आपल्या दिवंगत भावाचे म्हणजे कै. गोविंद लांडे याचे स्वप्न आणि संकल्प असलेले या स्मार्ट ग्रंथालय साकारले. या सामाजिक कार्यामुळे सर्व मान्यवरांनी व उपस्थितांनी या वेळी विजय लांडे याचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. या सोहळ्याच्या निमित्ताने गावातील प्रत्येक घराबाहेर सडा रांगोळी रेखाटली होती त्यामुळे हा सोहळा विशेष लक्षवेधी ठरला. या सोहळ्याचे औचित्य साधुन श्री. व सौ. प्रयाग गहिनीनाथ वाघमारे यांना गोविंद स्मृती आदर्श माता पिता पुरस्कार,



विकास मोहन घोडके यांना गोविंद स्मृती आदर्श सुपुत्र पुरस्कार व श्री. दत्ता आश्रुबा बनकर यांना गोविंद स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी जयवंत जगताप, अनिल क्षीरसागर, बिभीषण क्षीरसागर, पांडुरंग क्षीरसागर, तुकाराम क्षीरसागर, ज्ञानेश्वर लांडे, भगवान क्षीरसागर, शरद तीपाले पवन कदम, हरिदास आबुज, सागर सागडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कविता

## लग्नाच्या जेवणावळी

लग्नाला उशीर
'आला जेवायला'
वापरती शब्द
लेट येणा-याला...१

लग्न होता क्षणी
जेवण्यास रांग
पंगत ती गेली
विविधता मांग...२

आहेर दिलांय
म्हणून हक्काचे
अर्धे ताटातच
समज फुकाचे...३

पुर्वीची ती शान
आता कुठे नाही
सोडा मारलेला
पोट जाम होई...४

ही जेवणावळ
अर्धा खर्च खाई
नकोशी ही वाटे
कर्ता खाली जाई...५

**सुरेश शिर्के**
**खारघर,पनवेल**

# वारकरी संप्रदायामध्ये स्वामी ही पदवी फक्त बंकट स्वामी महाराज यानाच आहे-ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे



स्व. विनायक मेटे यांचे कार्य पुढे चालवणार-ज्योतीताई मेटे डोंगराळ भागात निसर्ग रम्य अशा ठिकाणी वसलेले कपिलधार वाडी हे छोटेसे गाव अत्यंत सुंदर असून स्व.विनायक मेटे यांनी या भागात नेहमीच आपलेपणाची भूमिका घेतली होती. विकास कामे करत असताना सभागृह असो. कोविडच्या कठीण काळात प्रत्येक घरात अन्नधान्याची किट असो असे अनेक विधायक कामे स्व. विनायक मेटे यांनी या भागात केले आहे. गावातील नागरिकांनी मला येथे बोलून माझा सन्मान केला यासाठी मी सर्व गावकऱ्यांचे आभारी असून स्व. विनायक मेटे यांचे कार्य व कपिलधारवाडी गावासाठी नेहमीच विकास कामे करणार असल्याचे गौरव उद्गार सप्ताह निमित्त आलेल्या ज्योतीताई मेटे यांनी काढले.
-----------

दुष्काळ लवकर संपावा ईश्वरचरणी प्रार्थना करतो-डॉ.योगेश क्षीरसागर बीड जिल्ह्यात सध्या दुष्काळ परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्यासह शेतकऱ्यांना मशागतीसाठी पावसाची अत्यंत आवश्यकता असून दुर्गम भागात दुष्काळी परिस्थिती असतानाही गावातील एकजुटीमुळे सप्ताहाचे योग्य नियोजन झाले आहे. कपिलधार वाडीच्या पावन भूमीत ईश्वरचरणी प्रार्थना करतो लवकरच दुष्काळ परिस्थिती संपावी व पावसाचे आगमन व्हावे शेतकऱ्यांना मशागतीसाठी पावसाची अत्यंत आवश्यकता असून ईश्वरचरणी प्रार्थना करतो दुष्काळ लवकर संपणार असल्याची प्रतिक्रिया युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सप्ताह निमित्त आले असता यावेळी दिली.
- - - - - - - - - -

### मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कपिलधार वाडीत स्वागत!

नारळी सप्ताह निमित्त मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कपिलधार वाडीत स्वागत करण्यात आले. यावेळी मनोज जरांगे यांनी धार्मिक कार्यात आपण कोणतेही राजकीय विधान करणार नसल्याचे सांगत गावकऱ्यांनी केलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केला

बीड प्रतिनिधी वारकरी संप्रदाय हा खूप मोठा आहे.आणि या वारकरी पंथाचे मूळ हे बीड तालुक्यातील नेकनूर असून तेथील बंकट स्वामी महाराज हेच वारकरी संप्रदायात स्वामी म्हणून श्रेष्ठ आहेत. स्वामी या शब्दाचा अर्थ मालक किंवा धनी होतो ही पदवी वारकरी संप्रदायामध्ये फक्त बंकट स्वामी महाराज यांनाच आहे असे भावोद्गार ह.भ.प मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी काल कपिलधार वाडी येथे आयोजित त्री दिवशीय कीर्तन महोत्सवाच्या सांगता प्रसंगी घेतलेल्या काल्याच्या कीर्तनामध्ये बंकट स्वामी महाराज यांचा उल्लेख केला. या काल्याच्या कीर्तनासाठी महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा ॥देहुडा चरणी वाजवितो वेणू॥ ।।गोपिकारमणूस्वामीमाझा.॥ या अभंगावर सविस्तर असे किर्तन सेवा संपन्न झाली आपल्या कीर्तनामध्ये महाराजांनी श्रीकृष्णाने गोकुळामध्ये केलेल्या खोड्या बाल गोपाळ बरोबर घेऊन संपूर्ण गोकुळात घातलेला धुमाकूळ तसेच विविध प्रकारचे खेळलेले खेळ आणि केलेला काही चमत्कार देखील उदाहरणे देऊन सांगितला. या काल्याच्या कीर्तनामध्ये दहीहंडी या विषयावर देखील महाराजांनी सविस्तर भाष्य केले कीर्तनामध्ये मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याचबरोबर स्वामी या शब्दावर बोलताना बंकट स्वामी महाराज नेकनूर कर हे वारकरी संप्रदायामध्ये एकमेव स्वामी ही पदवी घेऊन ओळखले जातात. आणि दुसरे स्वामी म्हणजे जवळच असलेले मनमथ स्वामी हे आपण सर्वजण नशीबवान आहोत की या दोन स्वामींच्या सानिध्यात आपल्याला जन्म मिळाला म्हणून खरोखरच आपण नशीबवान आहोत असेही महाराजांनी सांगितले आणि महाराजांनी आपल्या परिसराचे वैभव असलेले संत श्रेष्ठ श्री मन्मथ स्वामी महाराज कपिलधार व श्री.गुरु बंकट स्वामी महाराज हे दोन्ही संत आपल्या परिसराचे वैभवान पडलेली भर आहे. आणि या संतांच्या सहवासात त्यांच्या पंचक्रोशीत आपला जन्म झाला आहे हे आपले वैभव आहे. आणि काल्याच महत्त्व सांगून आपले कीर्तनाची सांगता केली. या नाम सप्ताह मध्ये वाघेश्वरी मित्र मंडळ व कपिलधारवाडी मित्र मंडळ यांनी सर्व अतिथी पाहुण्यांचे स्वागत केले या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील,ज्योतीताई मेटे, डॉ.योगेश क्षीरसागर, संदीप नाना नवले (सरपंच) यांच्याबरोबरच गावातील सर्व गावकरी मंडळी भजनी मंडळ व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी किर्तन श्रावणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# दया क्षमा शांती तेथे देवांची वस्ती- - ह.भ.प.तुळशिदास महाराज शिंदे

## पशुपक्षी व वन्य प्राण्यांचा भटकती पानवाट्यामुळे थांबणारी आहे.

मानवी जीवन निसर्गाचा अविभाज्य घटक असून पर्यावरणाचा समतोल राखण्यात नद्या, वृक्षवेली, पशुपक्षी व वन्य प्राण्यांचा भटकती पानवाट्यामुळे थांबणारी आहे. याकरिता मोलाचा हातभार माजी मंत्री प्रा सुरेश नवले मित्र मंडळ च्या वतीने केला आहे. सगळीकडे विकासाच्या गोंडस नावाखाली नैसर्गिक साधनसामुग्रीचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होताना दिसत आहे. मात्र असे असले तरी समाजामध्ये अनेक सामाजिक संस्था, विविध संघटना, निसर्गप्रेमी नागरिक निसर्ग रक्षणासाठी प्रामाणिकपणे कार्य करत असतात, या पवित्र कार्याची अनुभूती बालाघाटाच्या डोंगर पट्ट्यात येत असून माझ्या हस्ते शुभारंभ होत आहे. त्याचा मला मनस्वी आनंद होत आहे. असे उद्गार ह.भ.प. तुळशीदास महाराज शिंदे यांनी पानवट्याच्या शुभारंभ प्रसंगी काढले असे उपक्रम राबविण्याचे विचार राजकारणात असतानाही सात्विक व कुशाग्र बुद्धिमत्ता असणाऱ्या माजी मंत्री सुरेशजी नवले यांच्या मनात येणे हे आदर्श विचारसरणीचे द्योतक असल्याचा उल्लेख शिंदे महाराजांनी यावेळी आवर्जून केला. सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गावरील बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नागनाथ देवस्थान, श्री संत मन्मथस्वामी देवस्थान कपिलधार, श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान मोरदरा कोळवाडी,



भगवान श्रीकृष्ण मंदिर समतेचे उपासक श्री चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पुणीत झालेले श्रीक्षेत्र पोहीचा देव मांजरसुंभा, श्री गुरु बंकट स्वामी महाराज संस्था नेकनुर या मंदिर परिसरातील कपिलधारवाडी, ससेवाडी, कोळवाडी, गवारी, रत्नागिरी या परिसरातील घाटामधे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असल्यामुळे वन्य प्राण्यांचे पाण्यासाठी होणारे हाल लक्षात घेऊन प्रा. सुरेश नवले मित्र मंडळ बालाघाट परिसराच्या वतीने दि.20 मे रोजी युवा नेते बाळासाहेब मोरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातुन व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पानवट्याचा शुभारंभ करण्यात आला. या शुभप्रसंगी ह.भ,प. तुळशीदास महाराज शिंदे, ह.भ.प. संत आनंदराव महाराज येडे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत(आप्पा) नवले, शिवाजीराव जाधव, श्रीमंत उबाळे, कोळवाडी ग्रामपंचायतचे सदस्य सोमीनाथ यादव,संभाजी कदम, महादेव नाईकवाडे, आबादेव ढेरे, विजय सरकाळे, भीमराव सवासे, भास्कर वाणी पाटील, रामहरी चाळक,गोकुळ जाधव, काकासाहेब शिंदे, बाबुराव येडे, शहादेव कदम, रुद्र महाकले, बबनदादा येडे,नाना मस्के, शिवाजी करडुले, बाळसींग परदेशी, रेवण येडे आदींची उपस्थिती होती.

# बोरद परिसरात मान्सूनपूर्व शेतीकामांना वेग.यांत्रिकी शेतीमुळे बैलांची संख्या मंदावली.

**वादळवार्ता/तळोदा**

इतरत्र अवकाळी पावसाचा जोर कायम असतांना बोरद परिसरात मात्र पाऊस नसल्याने मान्सूनपूर्व शेती मशागतीच्या कामाला वेग आल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

बोरद परिसर हा कापूस लागवडीच्या बाबतीत ही महत्त्वाचा परिसर मानला जातो त्याचबरोबर या ठिकाणी केळी,पपई,मिरची तसेच ज्वारी,मका पिकाची मोठ्या प्रमाणावर पेरणी व लागवड केली जात असते.असे असले तरी महिन्याभरापासून लग्नाचा समारंभ दणक्यात सुरू असल्याने मशागतीच्या कामाला काहीसा उशीर झाला आहे. सध्या मे महिना असल्याने मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच उन्हाची तीव्रता भयानक वाढली आहे.अजून रोहिणी नक्षत्राला सुरुवात देखील झाली नाही रोहीणी नक्षत्र अवघ्या ४ दिवसांवर येऊन ठेपले आहे त्यामुळे शेतकरी कामाला लागला आहे. खरीप हंगामातील पेरणीपूर्व शेतीची कामे शेतकरी उरकून घेत असल्याचे सध्या चित्र आहे.बोरद परिसरात शेतीच्या मशागतीच्या कामाने वेग धरला असून नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाच्या नेहमीच्या घसरणाऱ्या दरामुळे देखील शेतकरी चिंतेत आहे त्याची आर्थिक स्थिती खालावली आहे.

पूर्वी जमिनीची मशागत बैल जोडीने केली जात होती त्यामुळे शेतशिवारामध्ये या महिन्यांमध्ये बैलाच्या गळ्यातील घंटानादाचा मंजुळ आवाज ऐकावयास मिळत होता. आपल्या शेतात बैलाचे मल मूत्र विसर्जित व्हावे असे शेतकऱ्यांना नेहमी वाटत होते.परंतु बदलत्या काळानुसार व विज्ञान युगामध्ये शेतीची मशागत ट्रॅक्टरच्या सहाय्याने केली जाऊ लागली आहे त्यामुळे आता बैलांची संख्या देखील कमी दिसून येत आहे.

सुरुवातीला तळोद्याच्या यात्रेचे निमित्त साधून शेतकरी आपल्या शेताच्या कामासाठी नवनवीन बैलांची खरेदी या यात्रेतून करत होता मात्र आता यांत्रिक युग वाढल्याने बैलांची खरेदी देखील मंदावली आहे त्यामुळे शेतकऱ्यांकडे असलेल्या बैलांची संख्याही कमी झालेली सर्वत्र दिसून येते अगदी काही मोजकेच शेतकरी वगळले तर बैलजोडी कोणाकडेही दिसून येत नाही. असे असले तरी विज्ञान युगामध्ये अत्याधुनिक यंत्राच्या साह्याने शेती केली जात असली तरी ठराविक कामे बैलांच्या साह्यानेच केली जातात ज्यावेळेस शेतामध्ये पीक वाढते त्यावेळेस यंत्र त्या शेताच्या सारी मध्ये प्रवेश करू शकत नाही अशा वेळेस बैलांचीच मदत घ्यावी लागत असते त्यामुळे जरी लहान स्वरूपातली ट्रॅक्टर शेतकऱ्यांकडे आली आहेत तरीही ज्वारी तसेच मका या पिकांची आंतर मशागतीसाठी बैलांची आवश्यकता असते आणि बैलच नसल्यामुळे काही शेतकरी ह्या पिकाकडे आपला मोर्चा वळवितांना दिसून येत नाहीत.

सध्या परिसरात नांगरटी व नांगरटी झालेल्या क्षेत्रामध्ये रोटाव्हेटर फिरवण्याचे काम जोरात सुरू आहे. त्याचबरोबर काही शेतकरी हे ऊस लागवड करणार आहेत तर काही शेतकरी मिरची तर काही शेतकरी कापसाची लागवड करणार आहेत त्यामुळे आपल्या शेतामध्ये सारी पाडण्याचे काम देखील प्रगतीपथावर आहे.



यावर्षी अलनिनोचा प्रभाव नसल्यामुळे मान्सून वेळेत दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात येत आहे आणि यावर्षी मान्सून चांगलाच बरसणार असल्याचे देखील भाकीत हवामान विभागाकडून वर्तविण्यात येत आहे त्यामुळे शेतकरी आनंदित झाला असून मान्सूनपूर्व मशागतीच्या कामाला देखील उत्साहाने त्याने सुरुवात केली आहे.

गेल्या वर्षी असलेले डिझेलचे भाव यावर्षीही कायम असून भाड्याने शेतीचे कामे करणारे ट्रॅक्टर धारकांनीही आपला दर यावर्षी वाढविलेला नाही आहे त्या दारानेच कामे केली जात आहेत. नांगरणी साठी -२००० रुपये प्रति एकर दर असून रोटाव्हॅटर साठी १६०० रुपये प्रति एकर दर आहे. तर कल्टीव्हेटर साठी ७०० रुपये प्रति एकर दर आकारण्यात येत आहे. सारी पाडण्यासाठी देखील प्रति एकर ७०० रुपये दर आकारण्यात येत आहे.



वंचित बहुजन आघाडीचे बीड येथील नाशिक प्रभारी डॉ.नितिन सोनवणे यांचे चाळीसगाव घाटात चारचाकी वाहन अपघातात पाचजन गंभीरपणे जखमी झाले होते.त्यांना भेटण्यासाठी नेते मंडळी औरंगाबाद येथ गेले होते त्यामध्ये संपादक बालाजी जगतकर,गणेश धोंगरे,बंडु निसर्गन,भूषण लोळगे, लक्ष्मण मस्के, रंजित वाघमारे,मायकल वाघमारे,सुदामा आरेकर आदी दिसत आहेत.

# तंत्रज्ञानाचा अचूक व काटेकोर वापर केल्यास फळबागा जिवंत राहतील-शास्त्रज्ञ संजय पाटील

## सोयगावकर यांचे फळबागा वाचवा मोहिमेत आवाहन

**वादळवार्ता/सोयगाव**

दुष्काळी स्थितीत फळबागा वाचविण्यासाठी तालुका कृषी विभागाच्या वतीने मंगळवारी सोयगाव तालुक्यात फळबागा वाचवा मोहिमेत शिवार फेऱ्या काढून सुकलेल्या फळबागा ना भेटी दिल्या आहे यावेळी आयोजित जरंडी येथील कार्यक्रमात शास्त्रज्ञ संजय पाटील सोयगावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की पाण्याचा तुटवडा झाल्यास शेतकऱ्यांनी फळबागा वर उत्पादन घेण्या पेक्षा झाडे जगविण्यावर भर द्यावा त्यासाठी तंत्रज्ञानाचा डोळसपणे व अचूक वापर केल्यास फळबागा जिवंत राहतात असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ संजय पाटील सोयगावकर यांनी मंगळवारी केले दरम्यान सोयगाव तालुक्यात वाढते तापमान आहे त्यामुळे फळबागा जळत आहे परंतु त्या टिकविण्यासाठी फळबागाच्या मुळांशी पाच टक्क्यापेक्षा अधिक प्राणवायू असने गरजेचे आहे त्यामुळे झाडांची दम कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सांगून कमी पाण्याच्या स्थितीत झाडांच्या पर्णरंध्रे मधून पाणी उडून जाते यासाठी अत्रझिन ची फवारणी करावी यावेळी बदनापूर च्या कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ दीपक कच्छवे यांनीही आगामी खरीप हंगाम बाबत शेतकऱ्यांना खरिपाच्या पेरणीसाठी मार्गदर्शन केले चौकट--दरम्यान यावेळी तालुका कृषी विभागाच्या वतीने दुष्काळ परिस्थितीत फळबागा वाचवा मोहीमेत सोयगाव, जरंडी, बहुलखेडा आदी ठिकाणी शिवार फेरी काढून जळालेल्या फळबागा ना भेटी देण्यात आल्या होत्या..

यावेळी तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी मार्गदर्शन केले वाढत्या तापमानात वनस्पती मधून खोडा द्वारे पाणी बाहेर पडते त्यावेळी किवोलिन चा फवारणी करावी असेही संजय पाटील यांनी सांगितले कृषिभूषण रवींद्र पाटील,प्रदीप पाटील,डॉ अविनाश पाटील,प्रल्हाद महाजन, शिवाजी किसन पाटील,अविनाश शीतळकर,शांताराम पाटील,नरेंद्र पाटील, आदींसह शेतकऱ्यांची उपस्थिती होती मदन सिसोदिया तालुका कृषी अधिकारी ,रमेश गुंडले मंडळ कृषी अधिकारी संपत वाघ,समाधान चौधरी कृषी पर्यवेक्षक, बेबीचंद चौरे, विश्वजीत तायडे आदींनी पुढाकार घेतला

# अज्ञात व्यक्तींनी आणून सोडलेली ती ३ बालके शिशुगृहात दाखल

**वादळवार्ता/बीड**

बीड, दि. 21 :- काही अज्ञात व्यक्तीने मौजे इरला मजरा ता.माजलगाव जि.बीड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर तीन मुले दि १९/०५/२०२४ रोजी आढळून आली होती. नंतर माजलगाव ग्रामीण पोलिस स्टेशन व चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) कार्यालय यांने एकत्रित मिळून सदरील मुलांना सुखरूप बीड शहरातील वन स्टॉप सेंटर येथे तात्पुरतेप्रवेश देऊन ठेवले होते. आज सोमवारी सकाळी मा. बाल कल्याण समिती समोर मुलांना सादर करण्यात आले असून न्यायपीठ यांच्या आदेशवरून या तिन्ही मुलांना आर्वी येथील शिशुगृहात रवाना करण्यात आले आहे.

रविवारी समोर आलेल्या या प्रकरणात इरला माजरा, तालुका माजलगाव येथील ग्रामपंचायतीचे सरपंच यांना गावातील यांना माहिती मिळाली, गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात तीन अनोळखी मुले आहेत. त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, दोन मुले व एक मुलगी दिसून आली. मुलांना त्यांच्या पालकांविषयी विचारणा केली असता त्यांचे वडील हे गेवराई तालुक्यातील बोरीपिंपळगाव येथील तर आई माजलगाव तालुक्यातील पुंगनी येथील आहेत असे समजले. या तिन्ही मुलांना अज्ञात इसमांनी मंदिरात आणून सोडल्याचे समोर आले. चाईल्ड हेल्पलाईन, बीड कडील १०९८ क्रमांका वर हे प्रकरण प्राप्त झाल्या नंतर माजलगाव ग्रामीण पोलिसांना हे प्रकरण पत्र देऊन कळवले नंतर पोलीसांनी या मुलांना बीड येथे आणल्या नंतर सुधीर ढाकणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे व सदस्य संतोष वारे यांणी वन स्टॉप सेंटर, बीड यांना आदेश देऊन येथे मुलाना रविवारी राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आली. सोमवारी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव, चाईल्ड हेल्प लाईन जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप, सुपरवायझर प्रसाद पवार, सुपरवायझर प्रवीण वीर, वन स्टॉप सेंटरच्या कविता शिंदे यांनी सदरील तीन बालकांना बाल कल्याण समिती समोर सादर केले, अध्यक्ष अशोक तांगडे, सदस्य संतोष वारे,सदस्य सुरेश राजहंस यांनी मुलांचे समुपदेशन केले, मुलांना शेवटी आर्वी येथे शिशुगृहा कडे रवाना करण्यासाठी आदेश काढण्यात आले."अशा प्रकारचे बालक कोणालाही सापडले तर संबंधित पोलिसांना, चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) वर किंवा बाल कल्याण समिती, बीड येथे बालकांना सादर करावे, जेणे करून बालकांना हक्काचे घर मिळू शकेल" 0ते 18 वयोगटातील बालकांसाठी कोणतीही समस्या किंवा ते संकटात असतील तर टोल फ्री 1098 कळविण्यात यावी, जेणेकरून बालकांच्या हितासाठी तात्काळ कार्यवाही करणे सोयीचे होईल, असे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश बबनराव जाधव बीड यांनी कळविले आहे. संपर्कसाठी भ्रमणध्वनी क्रमांक 9921739003 हा आहे.

# खडकत येथे जिल्हा सिमेलगत पशु वाहतुकीस बंदी

**वादळवार्ता/बीड**

बीड, दि. 21:- मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड या ठिकाणी ब-याच वर्षापासून कत्तलखाने अवैधपणे सुरु असून कत्तल पासून निर्माण होणारी घाण गावाच्या आजुबाजुला टाकली जात असल्यामुळे भयंकर दुर्गंधी येत असून तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. सदर ठिकाणी गोवंशाची कत्तल झाल्यानंतर सर्व अवशेष हे नदीपात्रामध्ये फेकले जातात त्याशिवाय रक्त आणि इत्तर विना उपयोगी अवशेष हे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण करतात. या ठिकाणी गोवंश जनावरांचे हाडे त्यांचे शरीराचे कत्तल केलेले भाग जसे की खूर, पास, शिंग व डोके अर्धवट कुजत असलेल्या अवस्थेमध्ये दिसून आले आणि जे एकंदरित मानवी आरोग्याला आणि पशु आरोग्याला धोकादायक आहे. खडकत या गावातील आरोपी अहमदनगर- बीड सीमेवरील भागात अवैध कत्तली करून मांस विक्रीसाठी इतरत्र वाहतूक करत असल्याचे दिसून येते.

खडकत या गावाला होणारी पशुंची वाहतूक प्रामुख्याने अहमदनगर जिल्हयामधून होणारी असल्यामुळे अहमदनगर जिल्हयामधून येणा-या आणि जाणा-या पशुच्या वाहतुकीसाठी जी वाहतुक रस्त्याने चालत-चालत किंवा वाहनामार्फत होते त्यावर बंदी घालण्याचे आदेश निर्गमित करण्याची विनंती केली आहे.

मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड या गावामध्ये कोणताही पशुंचा मोठा बाजार भरत नाही किंवा इतर गोष्टीसाठी पशुंची वाहतूक करण्याचा प्रश्न उध्दभवत नाही पत्रात नमूद करण्यात आलेल्या परिस्थितीमध्ये पशुंची होणारी वाहतूक ही फक्त अवैध कत्तलीसाठी होते या निष्कर्षाप्रत मुख्य कार्यकारी अधिकारी पोहोचले आहेत व या निष्कर्षाशी सहमती दर्शवणे क्रमप्राप्त आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 133 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मौजे खडकत ता. आष्टी जिल्हा बीड या गावांमध्ये अहमदनगर जिल्हयामधून व या गावातून अहमदनगर जिल्हयामध्ये होणा-या पशुच्या वाहतुकीसाठी पूर्णत:बंदी घालण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी कळविले आहे.

# बारावीच्या परिक्षेत ऋतुजा सोळंकेचे यश

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**



बारावीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला. या परिक्षेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. सोळंके ऋतुजा प्रचंड या विद्यार्थीनीला बारावीच्या परिक्षेमध्ये ७८.५० टक्के गुण मिळाले आहेत. सदरील या विद्यार्थीनीचे सर्वस्तरातून व लोकरंजन परिवार तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे. ऋतुजा सोळंके ही पत्रकार प्रचंड सोळंके यांची मुलगी आहे.

# कालकथित दशरथ गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम संपन्न...बोधाचार्य सुनिल शिंदे यांनी उपस्थित जनतेला दिली धम्मदेशना

## शाहीर राजेंद्र इंगळे यांनी दिला दशरथ (आण्णा) यांच्या आठवणीला गितातून उजाळा

**वादळवार्ता/केज**

तालुक्यातील देवगाव येथील सेवानिवृत्त कलाकार दशरथ (आण्णा) गुणाजी गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमीत्त रविवार दि.१९ मे रोजी दुपारी महामानवांच्या व दशरथ (आण्णा) यांच्या प्रतीमांचेपुजन केल्यानंतर या ठीकाणी बोधाचार्य तथा प्राचार्य सुनिल शिंदे यांनी उपस्थित जनतेला धम्मदेशना दिली. तर सायंकाळी भिमशाहीर शाहीर राजेंद्र इंगळे यांनी आपल्ा सुमधूर आवाजातून दशरथ (आण्णा) यांच्या आठवणीला गितातून उजाळा दिला तेव्हा उपस्थित नातेवाईकांना आपले आश्रू आवरता आले नाहीत

केज तालुक्यातील देवगाव येथील सेवानिवृत्त नामवंत ढोलकी वादक कलाकार दशरथ (आण्णा) गुणाजी गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन १९ मे रविवार रोजी दुपारी तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेकर यांच्या प्रतिमानांचे बौ.दशरथ (आण्णा)ग्यकवाड यांच्या फोटोंच पुजन नातेवाईक मंडळीनी केले पुजन यावेळी बौध्दाचार्य तथा प्राचार्य सुनिल शिंदे व उत्तम (आप्पा) मस्के यांनी बुध्द वंदना व पुजा पाठाने हा कार्यक्रम सुरु झाला.यावेळी अनेकांना आण्णांच्या आठवणीला उजाळा दिला तर बोधाचार्य सुनिल शिंदे यांनी उपस्थित जनतेला धम्मदेशना देऊन म्हणाले जन्म झाला की मृत्यु हा येणारच आसतो आपण आपण सर्व नातेवाईक मंडळींनी आण्णांचे विचार समोर ठेऊन कार्य करावे असे शिंदे यावेळी म्हणाले.या कार्यक्रमासाठी उपस्थित राहीलेल्या नातेवाईक मंडळींचा गायकवाड परिवारांने सन्मान करुन आभार मानले.तर सांयकाळी अंबाजोगाई येथील राजेंद्र इंगळे,साक्षी साळवे माजलगांव यांच्या पार्टीचा भिम गिता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी भिमशाहीर राजेंद्र इंगळे,साक्षी साळवे,के. आर.बुरखुंडे,आनंद कांबळे,या सर्वांनी भिमगीत, लोकगीते गाऊन उपस्थित लोकांची मने जिंकली तर शेवटी शाहीर राजेंद्र इंगळे यांनी दशरथ (आण्णा) गायकवाड यांचा जून्या आठवणी गितातून जागृत केल्याने नातेकाईक मंडळींना आपले आश्रू आवरता आले नाहीत.

या कार्यक्रमासाठी देवगांवचे सरपंच अतुल (दादा) मुंडे,इंजिनिअर राणू डोळस,भास्कर मस्के,एकनाथ गायकवाड, आश्रुबा मुरकुटे पोलीस,गब्बर गायकवाड पोलीस,दिलीप डोळस,संपादक अशोक नागरगोजे,रामराव मुंडे,




शाहीर जोतीराम मुंडे,सुभाष मुंडे फौजी,ब्रदर श्रीहरी मुंडे,राजेंद्र मुरकुटे,रमेश सरवदे,राजेंद्र साळवे,एल.व्ही.सरवदे,दिलीप कांबळे,आरुण आंबळे, संपादक अजय भांगे,संतोष गालफाडे, राहूल सरवदे.गौतम बचुटे, कमलाकर राऊत,बलभीम बचुटे,प्रकाश सरवदे,आशिष पंडागळे विनोद ढोबळे, छाया साळवे सह गजराबाई गायकवाड, गयाबाई गायकवाड,शांताबाई सरवदे, तिलोतमा साळवे, तारामती डोळस,चिंगूताई पंडागळे, जयमाला मिसळे, पुनम नाईकवाडे,आश्विनी साळवे, लोचना वाघमारे सह महीला मंडळी व बालक या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार महादेव गायकवाड, डॉ.शरद गायकवाड,धनराज गायकवाड,सुयोग गायकवाठ, साहील गयकवाड यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.



# पाणी उशाला,कोरड घशाला

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

गंगापूर नगर परिषदेच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांची गैरसोय,पाण्यासाठी नागरिकांची भटकंती शहरवासीयांना आता महिन्यात एक वेळेस नळाला पाणी येते तर काही ठिकाणी २५ दिवसाला तर काही ठिकाणी १५ दिवसाला पाणी येते . तर म्हणावासे वाटते की पाणी उशाला पण कोरड घशालाअशी परिस्थिती सद्या गंगापूर शहराची झाली आहे. मागील पाच वर्षांपूर्वी गंगापूर शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन नवीन टाकण्यात आली होती परंतु ही पाईपलाईन अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्यामुळे पाइपलाइन गंगापूर शहरातील जागोजागी फुटलेली आहे तसेच गंगापूर शहरातील फुटलेली पाईपलाईन असल्यामुळे लाखो लिटर पाणी वायाला जातांना दिसून येत आहे. आता सध्या कडाक्याचा उन्हाळा सुरू आहे,अशा उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी वन वन भटकावं लागत आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून गंगापूर शहरवासीयांना आता फक्त महिन्याला एक वेळेस पाणी या प्रमाने पाणी मिळते.मागील तीन वर्षापासून गंगापूर नगर परिषद प्रशासकीय राज आल्यामुळे गंगापूर शहराला आता कोणी वाली राहिला नाही का? नगरपरिषदेमार्फत पाणीपुरवठा होत नसला तरीही पाणीपट्टी काही माफ होणार नाही. खरंतर नगरपरिषदेला सोळाशे रुपये वर्षाला पाणीपट्टी मागण्याचा कोणताही अधिकार राहिलेला नाही अशी चर्चा गंगापूर शहरात सुरु झाली आहे. निवडणूक तोंडाला आली की राजकीय पुढाऱ्यांना जनतेची आठवण येते परंतु निवडणूक झाली की परत पाच वर्षे जनतेची आठवण पुढाऱ्यांना येत नाही. अशी चर्चा गंगापूर शहरात रंगली आहे.

## संभाजी पाटील यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुभाष चौगुले**

तरसंबळे (ता.राधानगरी) येथील सामाजिक कार्यकर्ते संभाजी बापू पाटील यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेबद्दल त्यांना डी. जी.राठोड फौंडेशनच्या वतीने राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार (२०२४)देऊन नुकतेच गौरविण्यात आले. कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आला.

डी. जी. राठोड फाउंडेशन, दैनिक रोखठोक, आणि सखी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने २०२४ सालाचा समाज रत्न पुरस्कार वितरण सोहळा दिमाखात संपन्न झाला.विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. पुरस्कार वितरण कार्यक्रम प्रसंगी डॉ. शिवाजीराव शिंदे कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, मा. श मोहनराव गावकर सचिव विधिमंडळ गोवा, सदानंद सदाशिंव (डी. वाय. एस. पी. कोल्हापूर) सुनंदा बहनजी प्रवक्त्या ब्रह्माकुमारीज विश्वविद्यालय गोवा, दैनिक रोखठोक कार्यकारी संपादक डॉ. सुरेश. जी. राठोड, महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटना संस्थापक अध्यक्ष डॉ. कृष्णदेव गिरी महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटना सचिव डॉ.सुरेशची अग्रवाल, तसेच उपस्थित महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र प्रवीण



बेडक्याळे, संजय पाटील, लता चौगुले,आश्लेषा, चव्हाण, वैशाली ढंग, दिलीप रणवरे, पत्रकार,प्रकाश खतकर, वैशाली झांजगे,दत्तात्रय भेंडवडेकर, अमर चौगुले, युवराज मिरजकर व सर्व महिला पदाअधिकारी व सर्व पोलीस मित्र पदाधिकारी उपस्थित होते.

## बारावीच्या परिक्षेत संध्या शिंदे चे यश



**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

बीड बारावीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला. या परिक्षेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. संध्या शिंदे ही सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची विद्यार्थीनीला बारावीच्या परिक्षेमध्ये 72 टक्के गुण मिळाले आहेत. व लोकरंजन चे पत्रकार तेजस शिंदे यांच्या बहिण व लोकरंजन चे संपादक परमेश्वर सोळंके याची भाची आहे सदरील या विद्यार्थीनीचे सर्वस्तरातून व लोकरंजन परिवार तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

# कौशल्या कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश

## विज्ञान शाखेचा निकाल १००% तर कला शाखेचा निकाल ९८.५०%

**दैनिक वादळ वार्तापैठण/चैताली औटे**

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित, कौशल्या कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव येथील कनिष्ठ महाविद्यालयचा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च2024 परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल100 % व कला शाखेचा निकाल 98.50 % लागला. सालाबाद प्रमाणे याही वर्षी दोन्ही शाखेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

विज्ञान शाखेमध्ये प्रथम क्रं.कु.तांबे इंद्रा नितीन 90.50 %,द्वितीय क्रं.कु हुरणे रिद्धी प्रशांत 89.17 %,तृतीय क्रं: अकोलकर क्षितिज सचिन 88.67% व कु.पठाण साराबतुल जहागीरखान 88.67% व कु. बोबडे ऋतुजा बाळासाहेब 88.33% यांनी मिळवला. विज्ञान शाखा मध्ये 168पैकी विशेष प्रावीण्य 87,प्रथम श्रेणी 76,द्वितीय श्रेणी04 ने उत्तीर्ण होत निकाल 100% लागला.

तर कला शाखेमधून प्रथम क्रमांक .कु.औटे चैताली बद्रीनाथ 87.17%,द्वितीय क्रमांक .कु.मोरे योगिता अशोक 82.83%,तृतीय क्रमांक .मोरे शिवकन्या भारत 82. 00% यांनी मिळवला. कला शाखा मध्ये-69 पैकी विशेष प्रावीण्याने 17, प्रथम श्रेणी ने 36,तर द्वितीय श्रेणी ने 14 उत्तीर्ण झाले.

*संस्थेचे अध्यक्ष प्रा.चंद्रकांतजी गायकवाड साहेब सचिव वाल्मिकजी सुरासे साहेब, उपाध्यक्ष विठ्ठलराव पैठणकर साहेब, कोषध्यक्ष श्री विशालभैय्या सुरासे साहेब,कॉलेजचे प्राचार्य निलेशजी गायकवाड सर शाळेचे सहशिक्षक नंदकिशोर पातकळ, विजय सपकाळ,बालाजी नलभे, सोन्याबापु पालवे,नारायण औटे, आकेश दांडेकर, प्रवीण काळे, अमोल गायकवाड, प्रकाश कामडी, भाऊसाहेब गायकवाड, स्वप्नजा पाटील, अनिता तारख, शितल थिटे, अस्मिता भिसे, अक्षय शेळके, निखिल पापुलवार, महेश गायकवाड, सतिष पवार, विठ्ठल त्रिभुवन यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के

**वादळवार्ता/माजलगाव**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के लागला असून साक्षी कृष्णा खिरे ७९.१७, अनिकेत दिपक साळवे ७३.३३, आरती अर्जून फुलगे ७२.१७ असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.शंकर राठोड, प्रा. संदिप लऊळकर, प्रा.निर्मला चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख, उपाध्यक्ष ॲड.आर. डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख, संचालक शिरीष देशमुख, डॉ.सचिन देशमुख, प्राचार्य अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन केले.







दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )